






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०३.०७.२०२५ | अंक नं. ८१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020









# 'स्मार्ट मीटर'मुळे येताहेत अव्वाच्या सव्वा वाढीव बिले

## महावितरणचे वीज बिल पाहून बसतोयं 'शॉक', एजन्सीच्या हलगर्जीपणाचा नागरिकांना त्रास



नगर – नगर शहरात गेल्या काही दिवसांपासून महावितरण कंपनीने वीज ग्राहकांना स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याची मोहीम सुरु केलेली आहे. मात्र हे मीटर बसविल्यानंतर विजेची बचत होण्याऐवजी अनेक ग्राहकांना अव्वाच्या सव्वा वाढीव बिले येवू लागली आहेत. वीज बिल पाहून त्यांना एक प्रकारचा 'शॉक' बसू लागला आहे. मीटर बसविणाऱ्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हे होत असल्याचे समोर आले असून त्याचा नागरिकांना मोठा त्रास होत आहे.

केंद्र सरकारने सौर घर योजना सुरु केलेली आहे. त्यामुळे अनेक जण आपल्या घरावर सौर उर्जा यंत्रणा बसवत आहेत. त्यामुळे सरकारने आता विजेची बचत होण्यासाठी तसेच वीज गळती व चोरी रोखण्यासाठी स्मार्ट विद्युत मीटर बसविण्यास सुरुवात केली आहे. या स्मार्ट विद्युत मीटरला राज्यात तसेच देशातही मोठा विरोध होताना दिसत आहे, मात्र हा विरोध झुगारून महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. हे मीटर बसविण्यासाठी शासनाने नगर मध्ये एन सी सी या खाजगी कंपनीची नियुक्ती केलेली आहे. सुरुवातीला सर्व सरकारी कार्यालयांमध्ये हे मीटर बसविण्यात आले. त्या नंतर महावितरणच्या सर्व कार्यालयांमध्ये मीटर बसविण्यात आल्यावर आता वीज ग्राहकांच्या घरातील जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरु करण्यात आलेली आहे.

### काय आहे हे स्मार्ट विद्युत मीटर?

स्मार्ट विद्युत मीटर म्हणजे एक प्रगत प्रकारचे वीज मीटर आहे जे पारंपरिक मीटर्सच्या तुलनेत अधिक माहिती देते आणि वापरकर्त्यांना आणि वीज कंपन्यांना अनेक फायदे मिळवून देते. स्मार्ट मीटर तुमच्या घरातील वीज वापराचे अचूक आकडे नोंदवतात, जेणेकरून तुम्हाला तुमच्या वापराची योग्य माहिती मिळते. हे मीटर तुमच्या वीज वापराचा डेटा रिअल-टाइममध्ये (तात्काळ) उपलब्ध करून देतात.तुम्ही किती वीज वापरत आहात हे तुम्हाला सहजपणे कळते, त्यामुळे तुम्ही वीज वाचवण्यासाठी प्रयत्न करू शकता. वीज कंपन्यांना मीटर रीडिंगसाठी तुमच्या घरी येण्याची गरज नसते, त्यामुळे तुमचा वेळ वाचतो. वीज चोरी आणि गैरव्यवहार कमी होण्यास मदत होते. वीज खंडित झाल्यास त्वरित माहिती मिळाल्याने दुरुस्ती लवकर होते. या मीटरमुळे तुम्ही तुमच्या सोयीनुसार प्रीपेड सुविधा वापरू शकता.

### स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात का होतेय वाढ?

स्मार्ट वीज मीटर बसविण्यात आल्या नंतर येणाऱ्या वीज बिलात मोठी वाढ झाल्याच्या तक्रारी अनेक ग्राहक करू लागले आहेत. *(पुढील मजकूर पान २ वर)*







## बांधकाम व्यावसायिकाची प्लॉट खरेदीच्या व्यवहारात झाली १७.८० लाखांची फसवणूक

नगर – केडगावच्या दुधसागर सोसायटी परिसरात प्लॉटची खरेदी देण्यासाठी दोघांनी इसारापोटी १७ लाख ८० हजार रुपये घेऊन प्लॉटची खरेदी दिली नाही. तसेच घेतलेली रक्कम परत न देता फसवणुक केली असल्याची घटना डिसेंबर २०२३ ते १६ एप्रिल २०२५ दरम्यान भुषणनगर, केडगाव येथे घडली.

याबाबत बांधकाम व्यावसायिक सुरेश नाम देव लगड (वय ४३, रा. सुशांतनगर, सोनेवाडी रोड, केडगाव, अ.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा आदेश कंस्ट्रक्शन नावाने व्यवसाय असुन ते प्लॉट खरेदी करुन त्यावर घर बांधुन ग्राहकास विक्री करतात. डिसेंबर २०२३ मध्ये फिर्यादी हे केडगाव परिसरात घर बांधण्यासाठी प्लॉट पहात असताना त्यांच्या ओळखीचे तुकाराम रामदास कोतकर व गणेश पोपट लोंढे (दोघे रा.लोंढे मळा, सोनेवाडी अकोळनेर रोड, केडगाव) यांनी सांगीतले की, दुधसागर सोसायटी केडगाव परिसरात सौ.साधना बाळासाहेब औटी यांचा बिगरशेती प्लॉट आमचे दोघांकडे विक्रीस आहे. असे सांगुन त्यांनी फिर्यादीस नोटरी साठेखत दाखवुन विश्वास संपादन केला. त्यानंतर त्या प्लॉटची किंमत प्रतिगुंठा ८ लाख रुपये ठरली. त्याप्रमाणे पूर्ण प्लॉटची किंमत २४ लाख ७६८ रुपये ठरली. तसेच तुकाराम कोतकर यांनी याच परिसरातील मालक प्रेम चिन्ना काझी रेड्डी यांचा बिगरशेती प्लॉट माझेकडे विक्रीस आहे असे सांगुन त्यांनी फिर्यादी यांना नोटरी साठेखत दाखविले. त्यानंतर त्या प्लॉटची किंमत प्रतिगुंठा ७ लाख रुपये ठरली. त्याप्रमाणे पूर्ण प्लॉटची किंमत २९ लाख ८२ हजार रुपये ठरली.

त्यानंतर फिर्यादी यांनी प्लॉटचे इसारापोटी गणेश ऊर्फ भाईजान लोंढे यांना २ मार्च २०२४ ते ३ जून २०२४ दरम्यान वेळोवेळी शहर सहकारी बँक शाखा भुषणनगर केडगाव येथुन आरटीजीएस द्वारे ८ लाख रुपये, फोन पे द्वारे २ लाख ५६ हजार रुपये व रोख स्वरुपात २ लाख ४४ हजार रुपये असे एकुण १३ लाख रुपये दिले. तसेच तुकाराम कोतकर यांना एचडीएफसी बँक शाखा केडगाव या बँकेतुन १६ एप्रिल २०२४ रोजी आरटीजीएस द्वारे ४ लाख ४० हजार रुपये व फोन पे द्वारे ४० हजार रुपये असे एकुण ४ लाख ८० हजार रुपये दिले आहे. परंतु तुकाराम कोतकर व गणेश लोंढे यांनी फिर्यादी यांना प्लॉटची खरेदी दिली नाही. फिर्यादी यांनी दोन्ही प्लॉटचे इसारा पोटी दोघांना दिलेले १७ लाख ८० हजार रुपये फिर्यादी यांना परत न देता विश्वासघात केला आहे.


या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सुरेश लगड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुकाराम कोतकर व गणेश लोंढे यांचेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शॉक लागून १३ वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याने 'महावितरण'च्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

नगर – तेरा वर्षीय सृष्टी गणेश दुर्गीष्ट या अल्पवयीन मुलीस विजेचा शॉक लागून तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना वाकोडी रोडवरील चाहूराणा खुर्द येथील गोरे मळा येथे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी घडली होती. तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी महावितरणच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांविरुद्ध २ जुलैला गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत मयत मुलीचे वडील गणेश बबन दुर्गीष्ट (वय ३६, रा.गोरे मळा, चाहुराणा खुर्द, वाकोडी रोड, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी हे कुटुंबासह राहत असून, घरासमोर असलेला विजेचा खांब झुकलेला असून त्यावर विद्युत तारा खाली झूलतात. याबाबत फिर्यादी यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना तोंडी तक्रारी केल्या होत्या, मात्र कोणतीही कारवाई झाली नाही. फिर्यादी यांची मुलगी सृष्टी ही १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.४५ च्या सुमारास आजोबांना झोपेतून उठवण्यासाठी दुसऱ्या मजल्यावर गेली असताना, अचानक तिच्या काकीचे व आजोबांचे ओरडण्याचा आवाज आला. फिर्यादी यांनी धावत गॅलरीत जाऊन पाहिले असता सृष्टी गॅलरीत शांतपणे पडलेली होती. तिच्या जिभेचा थोडा भाग बाहेर आलेला होता, त्यामुळे विजेचा शॉक लागल्याचा अंदाज आला.

फिर्यादी यांनी सृष्टीला तातडीने आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथील डॉक्टर पारधे यांनी प्राथमिक तपासणीनंतर सांगितले की, सृष्टीला तीव्र विद्युत शॉक बसला आहे. तब्बल सहा दिवस उपचार घेतल्यानंतर, पुढील उपचारांसाठी तिला सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. मात्र, ९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६.३० वाजता उपचारादरम्यान सृष्टीचा दुर्दैवी मृत्यू झाला. फिर्यादी यांनी फिर्यादीत स्पष्टपणे म्हटले आहे की, हा मृत्यू केवळ व केवळ महावितरणच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. विजेचा खांब झुकलेला असल्याची वारंवार तक्रार करुन ही कुठलाही उपाय किंवा दुरुस्ती करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांच्या निष्काळजी कारभारामुळे १३ वर्षीय मुलीचा जीव गमवावा लागला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महावितरणच्या नगर शहर विभागाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# आमदार संग्राम जगताप यांच्या जीवितास धोका : पोलिस संरक्षण द्या

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाची पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी



आ.संग्राम जगताप यांना धमक्या देणाऱ्यांवर कारवाई करावी व जगताप कुटुंबियांना संरक्षण द्यावे या मागणीचे निवेदन पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ. (छाया – लहू दळवी)

नगर – जिहादी प्रवृत्तींच्या लोकांच्या विरोधात आणि हिंदूधर्माचा प्रचार व प्रसार करणाऱ्या आ.संग्राम जगताप यांना काही जिहादी लोकांकडून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. सोशल मिडीयावर त्यांच्या विरोधात गरळ ओकली जात आहे. त्यामुळे आ. जगताप यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून त्यांना तातडीने पोलिस संरक्षण देण्यात यावे, तसेच या जिहादींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांची ३ जुलै रोजी भेट घेवून हे निवेदन देण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विनीत पाऊलबुद्धे, अविनाश घुले, अजिंक्य बोरकर, आशाताई निंबाळकर, माणिक विधाते, बाळासाहेब पवार, सुरेश बनसोडे, दिपक खेडकर, रेश्मा आठरे, सागर बोरुडे, साधनाताई बोरुडे, मयुर बांगरे, लतिका पवार, युवराज शिंदे, सनी कोवळे, नितीन घोडके, राजेश भालेराव, श्रेणिक शिंगवी, गिरीश जगताप, महेश गलांडे, अंजली आव्हाड, धीरज उकिर्डे, मारुती पवार, सुनंदा शिरवळे आदी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हणले की, शहराचे आमदार संग्राम जगताप हे हिंदू धर्माच्या प्रचाराकरिता ठिकठिकाणी सभा मोर्चे व काही ठिकाणी आरत्या करण्याकरिता महाराष्ट्रभर जात असतात. काही ठिकाणी दोन धर्मातील वादविवाद असलेल्या मंदिरांमध्ये हिंदू जनसमुदाय सहित आरती अगर दर्शनाकरिता जात असतात. त्यामुळे त्यांना काही विशिष्ट धर्मातील लोकांनी जाणिवपुर्वक टार्गेट केले असल्याचे दिसून येते. त्यामध्ये त्यांनी प्रसार माध्यमांवर त्यांच्या धर्माच्या बाजुने व जाणिवपुर्वक आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधात चितावणीखोर वक्तव्ये केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी आमदार संग्राम जगताप यांना आम्ही गर्दीतुन गोळी मारु असे वक्तव्ये केलेले आहे.

त्यानंतर लगेचच २ जुलै रोजी आमदार संग्राम जगताप यांचे स्वीय सहायक सुहास शिरसाठ यांना त्यांच्या मोबाईलवर २ दिन के अंदर संग्राम को खतम करूंगा आशा आशयाचा टेक्स मेसेज अनोळखी व्यक्तीने केला आहे. काही विशिष्ट धर्माचे लोक हे जाणिवपुर्वक आमदार संग्राम जगताप यांना टार्गेट करुन त्यांच्या जिवाला काही धोका निर्माण होईल अशी वक्तव्ये करत असुन त्या चिथावणीतुन आमदार संग्राम जगताप यांच्या जिवितास निश्चितच आता धोका निर्माण झालेला आहे.

तसेच हे धमक्या देणाऱ्या लोकांपासुन त्यांच्या कुटुंबियांच्या जिवितास ही घातपात होण्याबाबत शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धमकी देणारे व्यक्ती व त्यांना चिथावणी देणाऱ्या व्यक्ती यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी. आमदार संग्राम जगताप यांची व त्यांच्या कुटुंबियांची संरक्षणाची जबाबदारी पोलिस प्रशासनाने घ्यावी. त्याकरिता लागणाऱ्या आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्या. सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर ज्या अनोळखी व्यक्तीने धमकी दिली त्या व्यक्तीला आणखी कोण मदत करत आहे, किंवा त्याच्या संपर्कात अजुन कोण आहे का ? या बाबतीत ही योग्य तो तपास करण्यात यावा, अशी मागणी या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेद्नाद्वारे केली आहे.

### प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली– पोलिस अधिक्षक घार्गे

या प्रकरणाबाबत कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे या प्रकरणाची पोलीस प्रशासनाने दखल घेतली असून योग्य ती कारवाई निश्चित केली जाईल, तसेच शहरातील अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर महापालिकेने कारवाई करावी आम्ही देखील त्यासाठी पोलीस संरक्षण देऊ अशी माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### स्व. द्वारकानाथ – रसिक सिने व क्रीडा समीक्षक

क्रिकेट रसिक व जुन्या जाणत्या सिनेरसिकांना द्वारकानाथ संझगिरी हे नाव माहित नसेल असे नाही. त्यांचे 'जिन आणि टॉनिक' हे पुस्तक नाव वाचून अरे असं दचकलात ना?

हे पुस्तक कुठल्याही मद्याच्या विषयाशी निगडीत नाही. हे प्रवास वर्णन आहे. मग प्रश्न पडतो हे कसं नाव? जिन आणि टॉनिक हे अतिशय सुंदर कॉकटेल आहे.

जिन म्हणजे अर्थातच मद्य. 'टॉनिक' म्हणजे इंडियन टॉनिक वॉटर. त्यामध्ये 'क्विनीन' असतं. एकेकाळी 'क्विनीन' हा मलेरियावरील जालीम उपाय होता.

त्यावेळी गोरे साहेब इंग्रज भारतातल्या मलेरियापासून वाचण्यासाठी इंडियन टॉनिक वॉटरचा उपयोग करत असत. त्यातून हे पेय तयार झालं.

स्व. द्वारकानाथ यांच्या या पुस्तकात त्यांनी आयर्लंड व पाश्चात्त्य संस्कृतीबद्दल लिहिलेलं आहे. त्याचबरोबर राजस्थान मधल्या भारतीय संस्कृतीबद्दल सुद्धा.

या पुस्तकातला 'जिन आहे' आयर्लंड आणि इतर पाश्चात्त्य संस्कृतीवरील लेख अन् 'इंडियन टॉनिक वॉटर' आहे राजस्थान, श्रीलंका, बँकॉक इ. आशियाई देशावरचे लेख. लेखांचे हे कॉकटेल 'जिन आणि टॉनिक' वाचकांना नशिलं वाटेल हे नक्की.

या पुस्तकात भारतीय शिल्पकला भागात बदामीतील गुंफा, हवेल्यांचं सौंदर्य, उंटाची सफर, निळं शहर, जोधपूरची शान उमेद – पॅलेस, सुवर्णनगरी जैसलमेर, त्यांचे सांस्कृतिक वैभव, करणी मातेचं मंदिर इ. राजस्थानात फिरुन आणतात तर आयर्लंड, श्रीलंका इ. तून पाश्चात्त्य संस्कृतीचीही सफर घडते.

मी त्यांचे लेख विशेषत: भारतीय क्रिकेट संघाच्या सामन्यानंतरचे व सिने कलाकारांवरील वाचलते. समर्पक, अलंकारिक व उदाहरणांनी ते आपले मुद्दे लिलया पटवायचे. एक रसिक, हरफनमौला समीक्षक होते. स्व. द्वारकानाथ संझजिरी...

# इंस्टाग्रामवर तरुणीला अश्लील संदेश पाठवून जीवे मारण्याची धमकी

## कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर व्याख्यान देणाऱ्या एका १६ वर्षीय विद्यार्थिनीला इंस्टाग्राम या सोशल मीडियावरुन अश्लील व अपमानास्पद संदेश पाठवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने कोतवाली पोलीस ठाण्यात २ जुलै रोजी फिर्याद दाखल केली.

नगर शहरात राहणारी व सध्या पुणे येथील महाविद्यालयात ११वी मध्ये शिकत घेत असलेली १६ वर्षीय विद्यार्थिनी ही महाराष्ट्रभर विविध शाळा आणि कार्यक्रमांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर व्याख्याने देणारी वक्ता आहे. तिने आपले अनुभव सोशल मीडियावरही शेअर केले आहे.

२ जुलै २०२५ रोजी दुपारी २.४० वाजता फिर्यादी हिने तिचे इंस्टाग्राम अकाउंट उघडले असता nissheikh Shaikh नावाच्या व्यक्तीच्या sahikhains या इंस्टाग्राम आयडीवरुन अत्यंत अश्लील, बेताल भाषा वापरुन, तसेच 'दहा दिवसात तुझा व संग्रामचा एन्काउंटर करेन' अशा स्वरुपाची जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. यासोबतच आणखी दोन अश्लील मेसेजेसही पाठवण्यात आले. ही संपूर्ण घटना पीडित मुलीने तिच्या आईला सांगितल्यानंतर तिच्या वडिलांनी तिला घेऊन तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी संबंधित इंस्टाग्राम युजर विरोधात पोक्सो सह माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीचा ठावठिकाणा शोधण्याचे काम पोलिसांनी सुरु केले आहे.

# आमदार संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी; स्वीय सहाय्यकाच्या मोबाईलवर आला धमकीचा मेसेज

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. ही धमकी त्यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेजद्वारे आली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आमदार संग्राम जगताप यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ (वय ३७, रा. बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) हे २ जुलैला दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास मार्केटयार्ड चौक परिसरात असताना त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून एक धमकीचा टेक्स्ट मेसेज प्राप्त झाला. या मेसेजमध्ये संग्राम को दो दिन के अंदर खत्म करुंगा असा थेट जीवे मारण्याचा इशारा देण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, शिरसाठ यांनी तत्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत सदर मेसेजबाबत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे कोतवाली पोलिसांनी अज्ञात मोबाईल धारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक फौजदार अमिना शेख करत आहेत.



नगर–कल्याण रोड, बागरोजा हडको व शहर लोकवस्तीमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे, रात्रीची पोलीसांची गस्त वाढवावी. तसेच रात्रीचे पेट्रोलिंग करण्यात यावे या मागणीचे निवेदन कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना भाजप मध्यमंडलाचे अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

# 'डायल ११२' या नंबरवर कॉल केल्यानंतरही पोलिस संबंधित ठिकाणी वेळेत आले नाही

## कामकाजामध्ये सुधारणा होणे आवश्यक, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी

नगर –शहरातील नगर–कल्याण रोड, बागरोजा हडको व शहर लोकवस्तीमध्ये नजीकच्या काळामध्ये दरोडयासह चोरीच्या घटना व घरफोडी झाल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. अशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. संबंधीत तक्रारदारांनी घटना घडल्यानंतर 'डायल ११२' या नंबरवर कॉल केल्यानंतरही तातडीने पोलीस संबंधीत ठिकाणी वेळेत आले नाही. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असुन अशा घटना पुन्हा घडु नये. याकरिता संबंधित कामकाजामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही कॅमेरे, रात्रीची पोलीसांची गस्त वाढवावी. तसेच रात्रीचे पेट्रोलिंग करण्यात यावे. याबाबतचे निवेदन भाजप मध्यमंडलाचे अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांच्या नेतृत्वाखाली कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना देण्यात आले. याप्रसंगी सावेडी मंडलाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, सरचिटणीस प्रशांत मुथा, पंडित वाघमारे, संतोष गांधी, सुहास पाथरकर, महेश गुगळे, हर्षल बोरा, रुपेश वर्मा, नीरज राठोड, पियुष तावरे, राहुल जामगांवकर, डॉ.दर्शन करमाळकर, सौ.सुनंदा गंजी, शंकर कडू, संतोष राजभोज आदी उपस्थित होते.

वरील घटनेतील जे कोणी आरोपी असतील त्यांचेवर तातडीने कारवाई करून न्याय देण्यात यावा. जेणेकरुन भविष्यामध्ये कुठल्याही नागरीकाची जिवित हानी व आर्थिक नुकसान होणार नाही. याबाबत आपण तातडीने उपाययोजना करावी.

# 'स्मार्ट मीटर'मुळे येताहेत अव्वाच्या सव्वा वाढीव बिले

*(पान १ वरुन)*

ज्या ग्राहकांना पूर्वी महिन्याला साधारण २ ते ४ हजारांच्या दरम्यान वीज बिल येत होते त्या ग्राहकांना आता ५ ते १० पट बिले येवू लागली आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि संतापाची लाट उसळली आहे. याबाबत आम्ही सविस्तर माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता तांत्रिक चुकीमुळे हे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे मीटर हे आधुनिक तंत्रज्ञान असलेले आहे. त्यात सॉफ्टवेअर आहेत. ते मीटर बसविताना इंस्टॉलेशन करावे लागते. जुन्या मीटर मधील रीडिंग यात भरावे लागते. हे काम एजन्सीचे कर्मचारीच करतात, त्यात सर्वच कर्मचारी हे अनुभवी असतात असे नाही. काही जण शिकावू पण आहेत. त्यांच्याकडून तांत्रिक चूक झाल्यास वीज बिले पूर्वी पेक्षा जास्त येतात. अशी माहिती समोर आली आहे.

### महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे

वीज बिल जास्त आलेले ग्राहक ही बिले घेवून तक्रार करण्यासाठी त्यांच्या जवळच्या महावितरणच्या शाखा कार्यालयात गेल्यावर तेथील अधिकारी – कर्मचाऱ्यांकडून त्यांना चांगली वागणूक मिळत नाही, उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यांच्या शंकांचे निरसन करण्याऐवजी यापूर्वी तुम्ही वीज चोरी करत असाल म्हणून कमी बिल येत असेल. पण आता तुम्ही जेवढा वापर केला तेवढे बिल आले. अशी उत्तरे देवून एकप्रकारे नागरिकांनाच चोर ठरवू लागले आहेत. तर काहींना वरिष्ठ कार्यालयात अर्ज करा, तपासणी केल्यावर पाहू अशीही उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे चुका महावितरण ने नेमलेल्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी करायच्या आणि हेलपाटे नागरिकांना मारायला लावायचे असा प्रकार सुरु असल्याने नागरिकांच्या संतापात भर पडत आहे.

### ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणार – कार्यकारी अभियंता

या संदर्भात महावितरणचे शहर तथा ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांच्याची संपर्क साधून त्यांच्या निदर्शनास या बाबी आणून दिल्या असता, कोणत्याही ग्राहकावर अन्याय होवू देणार नाही, त्यांच्या तक्रारींचे निवारण केले जाईल. अनेक ग्राहकांनी जास्त वीज बिल आल्याच्या तक्रारी केलेल्या आहेत. त्यांच्या तक्रारीबाबत बिलिंग विभागाने खातरजमा करून त्यांच्या बिलांची दुरुस्ती करून देण्यात आलेली आहे. तसेच अशा तांत्रिक चुका होवू नये यासाठी संबंधित एजन्सीला सूचना देण्यात येतील. तसेच महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना ग्राहकांच्या शंकांचे योग्य निरसन करण्याच्याही सूचना देण्यात येतील असे कार्यकारी अभियंता चव्हाण यांनी सांगितले.

# भिंगारमध्ये दुकान फोडणाऱ्या चोरट्यांना मुद्देमालासह पकडले

नगर – येथील भिंगार शहरातील वेशी जवळील इलेक्ट्रिक दुकान फोडून वायर आणी इलेक्ट्रिक साहित्य चोरुन नेणाऱ्या दोन सराईत चोरट्याना भिंगार कॅम्प पोलिसांनी अटक करुन त्यांच्याकडून ९ हजार ९०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या बाबतची माहिती अशी की २४ जून २०२५ रोजी रात्री ९.३० ते २५ जूनच्या सकाळी ८.४५ च्या दरम्यान भिंगार वेशीजवळील श्री. इलेक्ट्रीकल्स दुकान फोडून चोरट्यानी इलेक्ट्रिक वायर व इलेक्ट्रिक साहित्य चोरुन नेले होते. या दुकानाचे मालक मयुर बद्रीनाथ बेद्रे (रा. द्वारकाधीश कॉलनी, आलमगीर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला होता.

तपासादरम्यान सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर व त्यांच्या पथकाने गोपनीय बातमीदारांचे नेटवर्क व तांत्रिक विश्लेषणाचा वापर करत आरोपींचा माग काढून भिंगार टेकडी लक्ष्मीनगर येथील राकेश राजू भोसले (वय २३) व नेहरु कॉलनी येथील मनोज दिलीप बाबर (वय २३) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली असून पोलिसांनी त्यांच्याकडून पाच सर्व्हिस वायर बंडल, एक मल्टीगेल वायर बंडल, एक बंडल सेलो टेप आणि रोख रक्कम असा ९ हजार ९०० रुपये किंमतीचा चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई स.पो.नि. जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. मोहन भेटे, विलास गारुडकर, बापूसाहेब म्हस्के व पोलीस नाईक शाहीद शेख यांनी केली आहे.

# केडगावमध्ये अल्पवयीन मुलीची आत्महत्या

नगर – केडगाव उपनगरातील देवी मंदिराच्या पाठीमागे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीने गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. तपस्या संजय सुर्यवंशी (वय १६) असे आत्महत्या केलेल्या अल्पवयीन मुलीचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

तपस्या हिने गळफास घेतल्याचे २ जुलै रोजी सकाळी समोर येताच तिला उपचारासाठी तिच्या नातेवाईकांनी खासगी रूग्णालयात दाखल केले. मात्र तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मृतदेहाचे शवविच्छेदन येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात करण्यात आले. दरम्यान, तपस्या हिने आत्महत्या का केली? याचे कारण समजू शकले नाही. तिला आत्महत्येस कोणी प्रवृत्त केले का? याचा शोध पोलीस घेत आहे.

# प्रभाकर वराडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – शहरातील तोफखाना भागातील शेरकर गल्ली येथील रहिवाशी प्रभाकर जगन्नाथ वराडे (वय ६९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, ३ मुली, २ भाऊ, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुधीर वराडे यांचे वडील होत.

# नगरजवळ महामार्गावर ट्रक चालकाला चाकूने वार करत लुटले

## पोलिसांनी १२ तासात पकडली चौघांची टोळी, तीन अल्पवयीन मुलांचा समावेश



नगरजवळ महामार्गावर ट्रक चालकाला चाकूने वार करत लुटणाऱ्या आरोपींना पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – अहिल्यानगर– छत्रपती संभाजीनगर मार्गावर ट्रक थांबवून चालकावर चाकूने हल्ला करत त्यांच्याकडील रोकड जबरदस्तीने लुटणाऱ्या चार जणांच्या टोळीचा एमआयडीसी पोलिसांनी १२ तासांत छडा लावला आहे. पकडलेल्या चौघांकडून ७५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात धीरज ऊर्फ जॉकी जॉन आवारे (वय १९ रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) याला अटक केली असून तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत ट्रकचालक बालाजी किसन इंगळे (वय ३३, रा. कारेगव्हाण, जि. बीड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जुलै रोजी पहाटे ४.३० च्या सुमारास ते त्यांच्या ताब्यातील ट्रक घेऊन जात असताना हटिल स्वागत, जेऊर टोलनाक्याजवळ चार अज्ञात इसमांनी त्यांची गाडी अडवून, त्यांच्यावर चाकू सदृश लांब हत्याराने हल्ला केला. त्यानंतर खिशातील रोख १५ हजार रूपये जबरदस्तीने काढून संशयित पळून गेले. या हल्ल्यात इंगळे जखमी झाले असून त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होताच सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपीचा शोध घेतला. मिळालेल्या माहितीवरून धीरज उर्फ जॉकी जॉन आवारे आणि त्याचे तीन अल्पवयीन साथीदार हे गांधीनगर परिसरात असल्याचे निष्पक्ष झाले. पोलिसांनी त्वरित कारवाई करत चारही संशयित आरोपीना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

ही कामगिरी सहायक निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अंमलदार राकेश खेडकर, राजू सुद्रीक, सचिन आडबल, संदीपान पितळे, शैलेश रोहोकले, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, शिवाजी मोरे, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर शहरातील ३ खेळाडूंची कनिष्ठ राष्ट्रीय फुटबॉल कॅम्पसाठी निवड, कृष्णराज टेमकर, भानुदास चंद आणि जसवीर ग्रोव्हर यांचा समावेश

### महाराष्ट्र संघ निवडीसाठी मुंबईत होणार प्रशिक्षण



नगर – जिल्ह्यातील फुटबॉलच्या इतिहासात प्रथमच शहरातील ३ खेळाडूंची अखिल भारतीय फुटबॉल महासंघाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कनिष्ठ राष्ट्रीय फुटबॉल कॅम्पसाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये कृष्णराज गुरुदत्त टेमकर, भानुदास पंढरीनाथ चंद आणि जसवीर कुलदीपसिंग ग्रोव्हर यांचा समावेश आहे. उदयोन्मुख खेळाडूंसाठी अत्यंत मानाची अशी समजल्या जाणाऱ्या डॉ. बी.सी. रॉय चषक (ज्युनिअर बॉईज राष्ट्रीय स्पर्धा) मध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षण शिबिरासाठी सदर खेळाडूंची निवड झाली आहे.

या खेळाडूंनी नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करताना निवड समितीचे लक्ष वेधले. त्यांच्या खेळातील कौशल्य, मैदानावरील चपळता आणि संघभावना यामुळे त्यांची निवड राष्ट्रीय पातळीवरील कॅम्पसाठी करण्यात आली आहे. या खेळाडूंच्या कामगिरीमुळे जिल्ह्याच्या संघाने राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर अशा मातब्बर संघांचा पराभव करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. कृष्णराज टेमकर आणि भानुदास चंद हे आठरे पाटील पब्लिक स्कूलचे तर जसवीर ग्रोव्हर हा तक्षिला स्कूलचा विद्यार्थी आहे. प्रशिक्षण शिबिराची सुरुवात पुढील आठवड्यात मुंबई येथील कूपरेज मैदानावर होणार असून उच्च दर्जाचे मार्गदर्शन, आधुनिक प्रशिक्षण पद्धती आणि तांत्रिक ज्ञान या खेळाडूंना मिळणार आहे.

जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रौनप फर्नांडिस यांनी खेळाडूंच्या निवडीबद्दल माहिती देताना सांगितले की, या खेळाडूंची निवड ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब असून, हे यश खेळाडूंच्या कष्टाचे आणि त्यांचे प्रशिक्षक, पालक आणि जिल्हा फुटबॉल संघटनेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील युवा खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडू येत्या दिवसात राष्ट्रीय पातळीवर झळकावेत यासाठी प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खेळाडूंच्या निवडीबद्दल जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, अमरजितसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रौनप फर्नांडिस, सह–सचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी, संघ व्यवस्थापक वैभव मनोदिया आदींसह पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# 'डॉ.पाऊलबुधे पॉलिटेक्निक'च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

### संगणक शाखेचा विद्यार्थी ऋषिकेश पागीरे ९०.९% गुण मिळवून पहिला



नगर – नगर–सोलापूर रोड वरील नारायणडोह येथील डॉ.एन.जे. पाऊलबुधे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी एमएसबीटीई उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत चमकदार कामगिरी केली असुन उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या निकालात पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवले आहेत तर विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीचे गुण मिळवले आहेत. विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि दर्जेदार शिक्षण देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. कॉलेज मधील संगणक शाखेचा विद्यार्थी ऋषिकेश पागीरे ९०.९% गुण मिळवून पहिला आला. तर मुलींमध्ये स्नेहल ठोंबरे संगणक शाखामधुन ८९.७% मिळवून पहिली आली.

खालील विद्यार्थ्यांनी मिळवलेले गुण – सालेव स्तुती हिने संगणक शाखामधुन ८८.८% गुण मिळवले., श्रेयश कल्याणम मेकॅनिकल शाखा ८०% गुण., भास्कर दासरी यांत्रिकी शाखा ७८% गुण., रोहित कोक्कुळ मेकॅनिकल शाखा ७५% गुण., समर्थ राऊत इलेक्ट्रिकल शाखा ८४% गुण., वाघ तुषारी इलेक्ट्रिकल शाखा ७३% गुण., सौंदर्या डोमल इलेक्ट्रिकल शाखा ६६% गुण., खुशी रास्कर सिव्हिल इंजिनीअरिंग शाखा ८६% गुण., पवार विश्वजीत सिव्हिल इंजिनीअरिंग शाखा ८१% गुण., स्वराज खरपुडे सिव्हिल इंजिनिअरिंग शाखा ७६% गुण मिळविले आहेत. पहिल्या वर्षाच्या संगणक शाखेतून वैष्णवी जगताप ने गणितात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

एमएसबीटीई परीक्षेत आमचे विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे पाहून आम्हाला आनंद झाला आहे. असे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे म्हणाले. त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि समर्पणाचे फळ मिळाले आहे आणि आम्ही त्यांना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा देतो.



नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर प्रशालेत पहिली पालक शिक्षक संघ सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

# चितांबर विद्यालयात पहिली पालक शिक्षक सभा

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर प्रशालेत पहिली पालक शिक्षक संघ सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. यावेळी पालक प्रतिनिधींची तसेच शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. विभावरी रोकडे सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी भरत बोरुडे तर उपाध्यक्षपदी सौ. पल्लवी माकोणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच पालक शिक्षक संघाच्या विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली.

मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच पालकांच्या जबाबदाऱ्या याविषयी पालकांशी सुसंवाद साधला. त्यांनी पालकांच्या विविध शंकांचे निरसन केले. यावेळी पर्यवेक्षिका श्रीमती मंदा शिंदे, शाळेचा सर्व स्टाफ तसेच पालक उपस्थित होते.

गणेश उघडे व विजय कुलकर्णी यांनी पालक प्रतिनिधींची निवड केली. सौ.कल्पना काळोखे यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांची पालकांशी चर्चा केली.

प्रशांत कुलकर्णी यांनी सभेचे सूत्रसंचालन केले तर योगिता चंद्रात्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची चास येथील आडसूळ पॉलिटेक्निकला अतिउत्तम श्रेणी प्रदान




आडसूळ पॉलिटेक्निकला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची अतिउत्तम श्रेणी श्रेणी प्रदान झाल्याबद्दल अनिरुद्ध आडसूळ, सचिव सौ. लीनाताई आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ आदी.

नगर – चास येथील सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निकमधील सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल या शाखेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अतिउत्तम (Very Good) श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने महाविद्यालयात २६ मार्च २०२५ रोजी भेट दिली व त्याअंतर्गत महाविद्यालयाचे बाह्य परीक्षण करण्यात आले. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यामधील अध्यापन, अध्ययन, अत्याधुनिक प्रयोगशाळा व त्यातील उपकरणे, नवीन उपक्रम, प्रशासकीय बाबी, विद्यार्थ्यांशी संवाद आणि संस्था स्तरावरील शैक्षणिक कामकाजाची पाहणी करण्यात आली, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी म हाविद्यालयामध्ये होणार्या वेगवेगळ्या कार्यशाळा, गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थ्यांच्या विविध कंपनीमध्ये झालेली निवड, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबरोबरच असणारे टेक्निकल स्किल्स या सर्व बाबींचे समितीने कौतुक केले. प्राचार्य आर. एस. गडाख यांच्यासह सर्व विभागप्रमुखांनी माहिती समितीस सादर केली त्यानुसार ३० जून रोजी आडसूळ पॉलिटेक्निकच्या सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल या सर्व विभागाला अतिउत्तम श्रेणी प्राप्त झाली.

याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ, सचिव सौ. लीनाताई आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, डिग्री कॉलेज डायरेक्टर आणि प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील, अडसूळ आर्टस् कॉमर्स अॅण्ड मॅनेजमेंट कॉलेजचे डायरेक्टर डॉ. संभाजी पठारे, विविध प्राचार्य डॉ. संदेश वायाळ, डॉ. धनंजय लांडगे, डॉ. प्रदीप पंडित आणि संचालक मंडळ यांनी प्राचार्य रमेश सूर्यभान गडाख, विभाग प्रमुख प्रा. एम. के. जगधने, प्रा. एस. एस. पवळे, प्रा. एम. बी. जाधव, प्रा. पी. पी. होले, प्रा. ए. ए. म्हस्के, प्रा. एस. सी. पाळंदे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश गडाख यांनी महाविद्यालयाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

# शैक्षणिक साहित्य वाटपाने विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याची संधी

### अमोल बागुल यांचे प्रतिपादन; विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटप



समर्थ विद्या मंदिर प्रशालेत विनायकराज प्रतिष्ठानतर्फे वह्या वाटप करण्यात आले. (छाया– विजय मते)

नगर – शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना सामाजिक बांधिलकी, शिक्षणाविषयी जाणीव आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठीचा एक छोटासा हातभार आहे. आज १५० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करून विनायकराज प्रतिष्ठानने एक छोटासा उपक्रम राबविला. यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याची संधी आहे. मुलांनो तुम्ही शिका, अभ्यास करा, प्रगती करा, ज्ञानाने तुमच्या आयुष्याचे सार्थक होईल, असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते अमोल बागुल यांनी केले.

सावेडी येथील समर्थ विद्या मंदिर प्रशाळेत शालेय व यांचे वाटप विनायकराज प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष विनय वाखुरे, अतुल देव्हारे, पांडुरंग कोलते, मृगांक मुळे, मयूर कुलकर्णी, मुख्याध्यापिका संगीता जोशी, कानडे सर उपस्थित होते.

श्री.बागुल म्हणाले विनायकराज प्रतिष्ठानने हा उपक्रम राबवून समाजापुढे चांगला आदर्श ठेवला आहे. समाजासाठी काहीतरी चांगले करू शकतो, ही भावना समोर ठेवून प्रत्येकाने असे काम केले तर विद्यार्थ्यांना मदत होईल. शैक्षणिक साहित्याची उपलब्धता वाढवण्याबरोबरच सामाजिक बांधिलकीचा ही सकारात्मक संदेश समाजात पोहोचतो.

यावेळी मुख्याध्यापिका संगीता जोशी यांनी प्रतिष्ठानने राबवलेल्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले.



# इंटरनॅशनल ग्लोरी अवॉर्ड २०२५ ने डॉ. दीपक हरके सन्मानित

मुंबई येथील नोवोटेल हॉटेलमध्ये व्हीकनेक्टस्टार ईव्हेंट्सच्यावतीने देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा इंटरनॅशनल ग्लोरी अवॉर्ड २०२५ ने गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यामध्ये अभिनेत्री तमन्ना भाटिया यांच्या हस्ते जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल इंटरनॅशनल ग्लोरी अवॉर्ड २०२५ ने सन्मान करण्यात आला. यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या मोटिवेशनल स्पीकर बी के क्रीना दीदी, बी के विकास बारीक व बी के विकास अगरवाल उपस्थित होते.



केडगाव येथील सरस्वती विद्यालयात सुरु असलेल्या शैक्षणिक वर्षाची पहिली पालक सभा उत्साहात पार पडली.

# केडगावच्या सरस्वती विद्यालयात पालक सभा उत्साहात

### नवीन शैक्षणिक धोरण शिक्षकांसह पालकांनी स्विकारावे : अरुण कुलकर्णी

नगर – केडगाव येथील सरस्वती विद्यालयात सुरु असलेल्या शैक्षणिक वर्षाची पहिली पालक सभा उत्साहात पार पडली. या सभेत मुलांच्या सर्वांगीन विकासासाठी पालकांची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पालक वर्ग उपस्थित होते.

अरुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभा घेण्यात आली. कुलकर्णी म्हणाले की, सध्या शैक्षणिक धोरण झपाट्याने बदलत आहे. त्याचा स्विकार करुन पुढे जावे लागणार आहे. सर्वसामान्य वर्गातील मुलांना घडविण्याचे कार्य सरस्वती विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे. शिक्षणाने प्रत्येकात एक आत्मविश्वास निर्माण होतो. कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी शिक्षण ही यशाची पहिली पायरी ठरणार असल्याचे सांगून उच्च शिक्षण घेण्याचे त्यांनी सांगितले. तर बदलणारा अभ्यासक्रम, शिक्षण पद्धती, अध्यात्म तसेच विद्यार्थ्यांना वाचनाविषयी गोडी कशाप्रकारे निर्माण करावी याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

अॅड. प्रज्ञाताई असनीकर यांनी प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना पालकांनी हसत–खेळत शिक्षण कसे द्यावे. विद्यार्थ्यांसाठी घरामध्ये आनंददायी वातावरणात कसे वाढवावे?, मुलांचा आहार, विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक विकास कसा करावा? याविषयी पालकांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संदीप भोर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राबविण्यात येत असलेले उपक्रमाची माहिती देऊन विविध स्पर्धा परीक्षा, स्कॉलरक्षिप परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या गुणवत्तेचा आढावा घेतला.

यावेळी प्राध्यापक शेळके, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी, सर्व शालेय शिक्षक, पालक उपस्थित होते.

स्मिता खिलारी यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश साठे यांनी आभार मानले.

# 'विश्वभारती इंजिनीअरिंग कॉलेज'मध्ये अधिकृत प्रवेश केंद्र सुरू

### FC-5179 केंद्रात विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन व कागदपत्र पडताळणी सेवा उपलब्ध

नगर – महाराष्ट्र राज्य CET CELL कडून अधिकृत मान्यताप्राप्त FC-5179 प्रवेश प्रक्रिया केंद्र विश्वभारती अॅकॅडमीज कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, अहिल्यानगर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी राज्यस्तरीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, फार्मसी, बीबीए, बीसीए आणि एमबीए या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचे सर्व टप्पे समजावून देण्यात येत असून, ऑनलाईन अर्ज नोंदणी, आवश्यक कागदपत्रांचे अपलोडिंग, मूळ कागदपत्रांची पडताळणी व स्कॅनिंग, CAP Round प्रक्रियेतील ऑप्शन फॉर्म भरताना सहाय्य, तसेच प्रवेशाबाबत वेळोवेळी अपडेट्स आणि मार्गदर्शन मोफत दिले जात आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रियेतील अडचणींमुळे संधी गमवावी लागते, हे लक्षात घेता हे केंद्र त्यांच्यासाठी एक महत्वपूर्ण सुविधा ठरत आहे.

विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणीसाठी तात्काळ मदत मिळावी, यासाठी या केंद्रात अनुभवी व प्रशिक्षित प्राध्यापक आणि तांत्रिक सहाय्यक कार्यरत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन मिळावे याकडे केंद्राचे विशेष लक्ष आहे.

FC-5179 मध्ये अत्याधुनिक संगणक कक्ष, इंटरनेट, प्रतीक्षा कक्ष आणि डिजिटल सुविधा उपलब्ध असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सुलभता मिळावी हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांनी व पालकांनी या अधिकृत व मोफत सेवा केंद्राचा लाभ घ्यावा, तसेच विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिकृत केंद्रामार्फतच प्रवेश प्रक्रिया पार पाडावी असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी ७०३०९००७०९/७०३०९००७०६ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.



### नूतन छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी सुनील कुमार यांचे स्नेहबंधतर्फे स्वागत

छावणी परिषदेचे नूतन अध्यक्ष ब्रिगेडियर पी सुनील कुमार यांचा स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी रोपटे देऊन सत्कार केला. याप्रसंगी छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे उपस्थित होते.

# राज्यस्तरीय ख्रिस्ती वधु-वर मेळाव्याचे ५ जुलै रोजी आयोजन

नगर – कोल्हार येथील सेंट मार्टिन चर्च (CNI) व साप्ताहिक उपदेशक अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जुलै रोजी सकाळी ११ वा. वधु–वर परिचय मेळावा आयोजित केला आहे. याचा ख्रिस्ती तरूण–तरूणींने लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट मार्टिन चर्चचे रेव्ह. डिकण प्रकाश लोखंडे यांनी केले आहे.

कार्यक्रमासाठी नाशिक धर्मप्रांताचे बिशप रा. रेव्ह. एम.यु. कसाब उपस्थित राहणार आहेत. सर्व पंथीय ख्रिस्ती धर्मगुरूंचे मार्गदर्शन लाभणार आहे.

संपर्कासाठी रविंद्र (प्रकाश) लोखंडे मो. ७४४८२७०६४५, विक्रम गायकवाड ८००७८३६१७४, शाम लोखंडे ९१३०९३०५६७.

# अॅट्रासिटी व खुनाचा प्रयत्न : दोघांचा अर्ज नामंजूर

नगर– २४/०६/२०२५ रोजी दुपारी १ वाजता जखमी सुनिल रामलाल परदेशी हे त्यांचे हॉटेल मातोश्री, तिसगांव (ता. पाथर्डी) येथे असताना आरोपी गणेश संजय म्हस्के व सोमनाथ मच्छिंद्र लवांडे हे इतर आरोपींसमवेत आले व जेवणाच्या बिलावरुन भांडण झाले. त्या भांडणात आम्ही तुमचा काटा काढून तुम्हांला जिवे ठार मारतो असे म्हणून ते तेथून निघुन गेले व संध्याकाळी ६ वाजता इतर तीन आरोपींबरोबर आले व या दोघांचे बरोबरचे आरोपींनी सुनिल परदेशी यांचे बरगडीवर चाकूने मारहाण करून खुन करण्याचा प्रयत्न केला.

या प्रकाराबद्दल पाथर्डी पोलिस स्टेशन येथे वरील दोन आरोपी व इतर आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११५ (२) इत्यादी तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असता, वरील दोन आरोपींनी अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात अटकपुर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला असता, तो नामंजूर करण्यात आला जखमी सुनिल परदेशी हे तिसगांव गटाचे पंचायत समिती सदस्य आहेत. त्यांच्यातर्फे अॅड. सतिशचंद्र सुद्रिक यांनी मुळ फिर्यादीतर्फे काम पाहिले.

# वर्ग २ राजपत्रित अधिकारी पदावर रूपाली बोरुडे यांची निवड

### सासू–सासऱ्यांच्या, मामा–मामींच्या पाठबळामुळे यशाला गवसणी

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगा तर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा या परीक्षेत रुपाली बोरुडे यांना यश मिळाले आहे. त्यांची सहाय्यक अभियंता PWD (वर्ग २ राजपात्रित अधिकारी) या पदावर निवड झाली आहे. त्यांची जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद, स्टाफ सिलेकशन कमिशन या सर्व विभागांमध्ये स्पर्धा परीक्षा द्वारे कनिष्ठ अभियंता या पदावर निवड झाली होती. गेल्या वर्षभरात स्पर्धा परीक्षेत हे त्यांचे चौथे यश आहे.

रुपाली या बी.ई सिविल, एम.ई स्ट्रकचर असून सध्या त्या जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहे. वयाच्या चौथ्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले असतानाही आई व मामा मामी यांच्या मार्गदर्शनाने एम. ई स्ट्रकचर पर्यंतचे उच्च शिक्षण त्यांनी पूर्ण केले. राहुरी पंचायत समिती सदस्य कै. गुलाबराव शेरूजी बोरुडे व श्रीराम दूध संघांचे संचालक दिलीपराव शेरूजी बोरुडे यांचा त्या सुनबाई आहेत.



सासू–सासऱ्यांच्या रूपाने आई–वडील मलाभेटले त्यामुळेच मी हे यशाचे शिखर गाठू शकले, प्रत्येक मुलीला आई–वडील रुपी सासू–सासरे भेटले पाठबळ देणारे मामा–मामी सारखे नातेवाईक भेटले तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पाहिलेले स्त्री शिक्षणाचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार समोर ठेवून उत्तम प्रशासकीय काम करणार असून सातत्याने अभ्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, आयआयटीयन्स ॲकॅडमी, पुणे यांचे कोचिंग, तसेच पती इंजि. अजिंक्य बोरुडे, सासरे दिलीपराव बोरुडे, सासूबाई जयश्री बोरुडे व शोभा बोरुडे, दिर ॲड.सचिन बोरुडे (विधी अधिकारी) व राजेंद्र बोरुडे (प्रदेश सचिव युवा काँग्रेस), आई रेखा भालेराव, मामा उत्तमराव चव्हाण व गणेश साळवे (मा. पंचायत समिती सदस्य अहिल्यानगर), मामी सुनंदा चव्हाण व ज्योती साळवे तसेच सर्व परिवाराची साथ आणि प्रोत्साहन मिळाल्या मुळेच हे यश प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

या यशाबद्दल अपंग संजिवनी सोसायटी चेअरमन मधुकर भावले, संचालिका विद्या भावले यांच्या वतीने व मुकबधिर परिवाराच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोधमध्ये कु. अद्रिका गाडीलकर हिचे यश

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहिल्यानगर या शाळेची विद्यार्थिनी कु. अद्रिका संदीप गाडीलकर हिने इयत्ता १ ली मध्ये मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात ८ वा तर जिल्ह्यात ३ रा क्रमांक मिळविला आहे. तसेच राज्यस्तरीय लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये देखील जिल्ह्यात तृतीय क्रमांक तर स्टुडन्ट टॅलेंट सर्च या परीक्षेमध्ये केंद्रात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तिला शाळेचे मुख्याध्यापक लंके सर, वर्गशिक्षिका साळुंखे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. अद्रिका ही रयत शिक्षण संस्थेच्या श्री अंबिका विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक संदीप गाडीलकर यांची कन्या आहे.



# ‘अनाहत एक कलासृष्टीच्या’वतीने ७ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त अभंगवारीचे आयोजन

### अभंग, भक्तीगीत, गजर, दिंडी, धावा आणि रिंगण यांचे होणार सादरीकरण

नगर – येथील अनाहत एक कलासृष्टी संस्थेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त अभंगवारी या अभंग आणि भक्ती गीतांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन ७ जुलै रोजी सायं. ६ ते ९ या वेळेत माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.




या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन अखिल भारतीय नाट्य परिषदेचे उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांचे असून शास्त्रीय गायक अभिजित अपस्तंभ, ओंकार देऊळगावकर, गायिका सौ. अनुजा कुलकर्णी, सौ. रश्मी मल्हार गंधे, सौ. अमृता बेडेकर, सौ. श्रेया सुवर्णपाठकी आणि कु. स्वरा देऊळगावकर हे कलाकार गायन सेवा सादर करणार असून त्यांना संवादिनी वर संकेत सुवर्णपाठकी तर तबल्यावर प्रसाद सुवर्णपाठकी, ॲड. आनंद कुलकर्णी, सुपर्ण प्रताप, पखवाजावर सौरभ साठे तसेच तालवाद्यावर कुलदीप चव्हाण साथसंगत करणार आहेत.

या कार्यक्रमात अभंग व भक्तीगीत गायनाबरोबरच गजर, दिंडी, धावा, रिंगण या गोष्टी विशेष आकर्षण असणार आहेत. यामध्ये नगर मधील कला साधक आणि अनाहतचे सदस्य सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तसेच कार्यक्रमाच्या मोफत सन्मानिका उपलब्ध असून रसिकांनी या मैफलीचा आस्वाद घ्यावा असे आवाहन अविनाश शिरापुरी व संदिप कुलकर्णी यांनी केले आहे. मोफत प्रवेशिकांसाठी संपर्क – ९९२२५९७५९०/७९७२०२४०५९.

# झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे हे प्रभावी साधन

### अध्यक्षा अनुराधा आठरे यांचे प्रतिपादन

नगर – जंगलतोड, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि प्रदूषणामुळे हवामान बदलांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. यावर उपाय म्हणून झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे हे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर प्रियदर्शनीच्या नूतन अध्यक्षा रोटेरियन अनुराधा आठरे यांनी केले.



कृषी दिनाचे औचित्य साधून रोटरी प्रियदर्शनीतर्फे चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट संचालित बालगृह संस्थेमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कदंब, बहावा, करंद व चिंच या रोपांची लागवड करण्यात आली.

कृषी दिनाचे औचित्य साधून रोटरी प्रियदर्शनीतर्फे चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट संचालित बालगृह एमआयडीसी अहिल्यानगर या अनाथ, निराधार, एक पालकत्व मुला मुलींच्या संस्थेमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कदंब, बहावा, करंद व चिंच या रोपांची लागवड करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर अनिल सूर्यभान आठरे पाटील यांनी रोटरी प्रियदर्शनीने वृक्षारोपण केलेल्या रोपांचे संस्थेकडून संवर्धन केले जाईल असा संकल्प बोलून दाखवला. यावेळी असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन ईश्वर बोरा म्हणाले या कार्यक्रमाच्या माध्यमातून रोटरी क्लब पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पर्यावरण संवर्धन व प्रदूषण कमी करणे यासारखे समाज उपयोगी उपक्रम यूनाइट फॉर गुड या रोटरी च्या थीम च्या माध्यमातून राबविण्याचा मानस त्यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

रोटरी प्रियदर्शनीच्या सेक्रेटरी आश्लेषा भंडारकर म्हणाल्या या वृक्षारोपणानिमित्त प्रसिद्धीपासून दूर असलेल्या या संस्थेची ओळख झाली तसेच रोटरी प्रियदर्शनीने लागवड केलेल्या रोपांचे जतन संवर्धन करण्याची जबाबदारी संस्थेने घेतल्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले.

याप्रसंगी प्रेसिडेंट रोटेरियन अनुराधा आठरे, सेक्रेटरी रो अश्लेशा भंडारकर, रो कुंदा हळबे, रो नीलमणी गांधी, रो शुभा बोगावत, रो लता भगत, रो विभा तांबडे, रो रजनी भंडारी, ईश्वर बोरा, संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे, ट्रस्ट डॉक्टर अदिती आठरे, बालगृह अधीक्षिका कुमारी पुष्पांजली बाळासाहेब थोरात, संस्थेचे मॅनेजर शरद काकडे, कर्मचारी वृंद, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# ग्रामीण मराठी साहित्य संमेलनातील पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ॲड.सुरेश लगड यांची निवड

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे ६ जुलै रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आषाढी एकादशी व राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.



ॲड. सुरेश लगड ज्येष्ठ विधीज्ञ असून, ते विशेष सरकारी वकील म्हणून जिल्हा न्यायालयात कार्यरत आहे. सामाजिक क्षेत्रात देखील त्यांचे मोठे योगदान असून, विविध सामाजिक संघटना त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. या पुरस्कार वितरण सोहळ्यात ॲड. लगड यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जगद्गुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्कार, वारकरी भूषण, राजश्री शाहू महाराज समाजभूषण, समजारत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

# अशासकीय वसतिगृह अधीक्षक पदासाठी ७ जुलैपर्यंत अर्ज करा

नगर – जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अधिपत्याखालील असलेल्या सैनिकी मुलांचे वसतिगृह, अहिल्यानगर, कोपरगाव येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात वसतिगृह अधीक्षक उमेदवाराची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी पात्रता असलेल्या माजी सैनिकांनी ७ जुलै २०२५ पर्यंत करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

वसतिगृह अधीक्षक पदासाठी अर्जदार हा कनिष्ठ राजदिष्ठ अधिकारी म्हणून संरक्षण सेवेत ज्यांनी किमान ५ वर्ष सेवा केलेली असावी. अर्जदार निर्व्यसनी असावा. अर्जदारास संगणकाचे व लेखा विभगाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हे पद निवासी असून इच्छुक अर्जदाराची तेथे राहण्याची तयारी असावी. वसतिगृहाची रोकड वही मेन्टेंन करता यावी. उमेदवार हा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्च बुक, माजी सैनिक ओळख पत्र व आधार कार्डच्या छायांकित प्रती जोडाव्यात. कामाचे ठिकाण अहिल्यानगर, कोपरगाव येथे असेल. विहित मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांना मुलाखतीस कळविण्यात येईल.

इच्छुक माजी सैनिकांनी या संधीचा फायदा घ्यावा, असेही कळविण्यात आले आहे.



मोहरमच्या सहावी निमित्ताने यतीमखाना येथे भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# मोहरमच्या सहावी निमित्ताने यतीमखाना येथे भंडारा

नगर – अन्नदान हे पुण्याचे काम असून, हा उपक्रम राबवून एम के के ग्रुपच्या युवकांनी मोहरमचा एक चांगला पायंडा निर्माण केला आहे. या भंडाऱ्याच्या माध्यमातून अनेक गरजूंना आधार देखील मिळत असल्याचे प्रतिपादन विशाल वालकर यांनी केले

जुन्या महानगरपालिका समोर यतीम खाण्यातील विद्यार्थ्यांसाठी मोहरमच्या सहावी निमित्ताने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशाल वालकर, निलेश खरपुडे, आसाराम रासकर, पै.मनोज लोंढे, अध्यक्ष इम्रान खलिफा, मौलाना मोहम्मद इस्लाम रजा, मौलाना अब्दुल कासिम, ताहिर खलिफा, मोहसीन मामू, सोनू भाई, हाजी जुनेद तांबटकर, आरिफ करीम जहागिरदार, अमजद कुरेशी, सय्यद रियाज अकबर, गुड्डू जहागीरदार आदी उपस्थित होते.

इम्रान खलिफा म्हणाले की नगर शहरातील सर्व धर्मिय बांधव गुण्यागोविंदाने राहत आहे. एकमेकांच्या सुख, दु:खात तर सण, उत्सवात ते सहभागी होत असतात. दरवर्षी होणारा भंडाऱ्याचा उपक्रम प्रेरणादायी आहे. यावर्षी आषाढी एकादशी व मोहरम एकाच दिवशी आल्याने धार्मिक एकतेचे दर्शन घडणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# साईदीप हिरोज आयोजित चॅम्पियन करंडक स्पर्धेत मराठा वॅरिअर संघ विजयी

### बेस्ट बॅट्समन, मॅन ऑफ द सिरीज म्हणून अहिल्यानगर येथील देवाशिष घोडके याचा गौरव

नगर – वाकोडी येथील साईदीप अॅकॅडमीवर गेले १५ दिवस चाललेल्या चॅम्पियन करंडक सामन्यात मराठा वॉरिअर संघाने समर्थ अॅकॅडमी संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. मराठा वॉरियर संघाने प्रथम फलंदाजी करताना ४० षटका मध्ये ८ बाद २९१ धावा केल्या. यामध्ये करण धामणे याने शतक झळकावले त्याने ११८ धावांची खेळी केली. त्याला प्रेम इघे याने सुंदर साथ देत ८० धावांची खेळ केली. तसेच प्रिन्स कुमार याने ३९ धावा करत चांगली साथ दिली. समर्थ संघाच्या आदित्य भापकर यांनी ४३ धावात तीन बळी घेतले. निमेश शिदोरे याने ५३ धावा देत बळी मिळवले. प्रत्युत्तर दाखल समर्थ संघाने ३९.५ षटकांमध्ये सर्व बाद १८८ धावा केल्या. यामध्ये सर्वाधिक धावा वरद भिसे यांनी ३६ धावा केल्या. रुद्र पवार याने २८ धावा केल्या. मराठा वॉरियर कडून सार्थक शिंदे यांनी ४३ धावात दोन बळी मिळवले तसेच प्रिन्स कुमार यांनी ३४ धावा दोन बळी मिळवले. बेस्ट बॅट्समन, मॅन ऑफ द सिरीज देवाशिष संदीप घोडके याने ४ सामन्यांमध्ये ३७५ रन केले. या स्पर्धेमध्ये देवाशिष घोडके याला उत्कृष्ट फलंदाज व सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये एकूण आठ संघाने आपला सहभाग नोंदवला. ही स्पर्धा साखळी सामन्यांची केली गेली एका संघाला तीन सामने खेळल्यास मिळाले. आजच्या सामन्याला प्रमुख पाहुणे म्हणून दादा चौधरी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष येवले व स्वामी मोबाईलचे संचालक संदीप पडोळे म्हणून लाभले.



साईदीप हिरोज आयोजित साखळी सामन्याच्या चॅम्पियन करंडक स्पर्धेतील विजयी संघ. (छाया – लहू दळवी)

मॅन ऑफ द मॅच फायनल : करण धामणे– ११२ रन, फायनल फायटर ऑफ द मॅच आदित्य भापकर – ३ विकेट, बेस्ट फास्ट बॉलर: सार्थक शिंदे ४ मॅच १० विकेट, बेस्ट स्पिन बॉलर : ओम देवळालीकर ५ मॅच ११ विकेट, बेस्ट फील्डर : सुमेध येणगुल, बेस्ट विकेटकीपर : प्रेम इघे यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी सुभाष येवले यांनी आपल्या भाषणामध्ये खेळाबरोबर शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व व अपयशाने खचून न जाता पुढच्या सामन्याची तयारी कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच संदीप घोडके यांचे ग्राउंड उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमास करण भोगाडे, सागर भापकर, प्रतीक पवार, रामकिसन शिंदे, बाबर सर, तेजस करमरकर, शेख सर, सुजय मोडवे, परेश रासकर, बोरुडे सर, प्रशांत शेरकर उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये पंच म्हणून वेदांत क्यादार व पियुष अष्टेकर यांनी तर स्कोरर म्हणून परेश रासकर यांनी काम पहिले. सूत्रसंचालन प्रशांत अंतेपोलु यांनी केले. ऋषिकेश सुंबे यांनी आभार मानले.




मोहरमच्या सातव्या दिवशी शिया बांधवांच्या वतीने कोठला येथे ३ जुलै रोजी मातम करण्यात आले. यावेळी नागरिकांनी गर्दी केली होती.

# जिल्ह्यातील उद्योजकांसाठी ८ जुलै रोजी निर्यात प्रोत्साहन कार्यशाळा

नगर – जिल्ह्यातील उद्योगांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देत निर्यातीला चालना व प्रोत्साहन देण्यासाठी ८ जुलै रोजी सकाळी १० वाजता ऑटो इंजिनिअरिंग क्लस्टर, प्लॉट क्र. ४७/५, एमआयडीसी येथे निर्यात प्रोत्साहन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योजक, निर्यातदार, नवउद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच निर्यात क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहन महाव्यवस्थापक दीपक शिवदास यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या निर्देशानुसार जिल्हा निर्यात प्रोत्साहन समितीच्या बैठकीत कार्यशाळेचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात उद्योजक, नवउद्योजक, निर्यातदार, शेतकरी उत्पादक संघटनांना निर्यातीसंबंधी विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी, निर्यात धोरणे, आवश्यक कागदपत्रे, निर्यात प्रक्रिया, उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यांचे निराकरण या विषयांवर तज्ज्ञ अनुभव सांगणार आहेत. ही माहिती उद्योजकांना एकाच ठिकाणी सर्व परवानग्या व प्रक्रिया समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल. माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशनरोड, शासकीय तांत्रिक विद्यालय आवार, एमएसईबी कार्यालयाच्या मागे, अहिल्यानगर येथे किंवा ०२४१–२३५५३४२.

# डॉक्टर म्हणजे फक्त वैद्य नाहीत, ते समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत

### इमरान शेख यांचे प्रतिपादन; पटेल स्पेशालिटी क्लिनिकतर्फे डॉक्टर डे निमित्त मोफत आरोग्य शिबीर

नगर – डॉक्टर म्हणजे फक्त वैद्य नाहीत, ते समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या सेवेचे आपण ऋणी आहोत. थायरॉईड, लिपिड प्रोफाईल, शुगर, व चरबी अशा अनेक महत्वाच्या तपासण्या मोफत करून देणे हा खरोखरच एक समाजोपयोगी आणि आदर्श उपक्रम आहे.

अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला आणि आपल्या आरोग्याबाबत जागरूकता वाढवली, हीच खऱ्या अर्थाने या उपक्रमाची यशोगाथा आहे. अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन पुढेही सुरू राहो ही अपेक्षा अल करम हॉस्पिटलचे इमरान शेख (भाईजान) यांनी व्यक्त केली.



किंग्जगेटरोड रामचंद्र खुंट येथील पटेल स्पेशालिटी क्लिनिकच्या वतीने डॉक्टर डे निमित्त मोफत रक्तातील थायराइड, चरबी, लिपीड प्रोफाईल, शुगर व इतर रक्त तपासण्या व निदान आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

किंग्जगेटरोड रामचंद्र खुंट येथील पटेल स्पेशालिटी क्लिनिकच्यावतीने डॉक्टर डे निमित्त मोफत रक्तातील थायराइड, चरबी, लिपीड प्रोफाईल, शुगर व इतर रक्त तपासण्या व निदान आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी डायबेटोलॉजिस्ट, कार्डिओलॉजिस्ट डॉ. अशपाक पटेल, अल करम हॉस्पिटलचे तौफिक तांबोली, इमरान शेख भाईजान, मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या सचिव डॉ. कमर सुरुर आदि उपस्थित होते. यावेळी रुग्णांची तपासणी डॉ.अशपाक पटेल यांनी केली. रक्त तपासण्या तुषार वर्पे, किरण वर्पे, अजीज पठाण, वसीम शेख यांनी केले. शिबीरात अनेक रुग्णांनी याचा लाभ घेतला.

# महानगरपालिकेत मानधनावरील अभियंत्यांना कायम सेवेत रुजू करण्याची मागणी योग्य नाही

## चित्रा वाघ यांच्या मागणीला नितीन भुतारे यांचा विरोध



नगर – मागील १० वर्षा पासून अहिल्यानगर महानगरपालिकेत पाणी पुरवठा, बांधकाम, इलेक्ट्रिक, नगररचना, अश्या अनेक विभागात मानधनावर काम करण्याकरिता महानगरपालिकेने नेमणूक केली आहे. त्यांनाच अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कायम सेवेत घेण्याकरिता भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी विधानपरिषदेत मागणी केली. त्यांची ही मागणी चूकीची असून याच मागील १० वर्षात मानधनावर काम करणाऱ्या या अभियंत्यांनी भ्रष्टाचार करण्याची स्पर्धा लावली आहे. प्रत्येक बांधकाम, इलेक्ट्रिक, पाणीपुरवठा विभागात पैसे घेतल्याशिवाय काम होत नाही. ठेकेदारांना कामांचे वाढीव बिले तयार करून महानगरपालिका लुटण्याचा डाव यांनी सुरू केला आहे. तसेच नगर रचना विभागात नियमानुसार बांधकाम परवानगी घ्यायची असेल तरी देखील हजारो रुपये घेतल्या शिवाय नागरिकांना बांधकाम परवानगी तसेच बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळत नाही, असा आरोप नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अंतर्गत शहरात लाच घेऊन नियम बाह्य पद्धतीने लेआऊट मंजूर केले जातात. अनेक नाल्यांवर अनधिकृतपने बांधकाम परवाने नगररचना विभागातून दिले गेले. महानगरपालिकेत कायम सेवेत असलेले अभियंते आणि मानधनावर असलेले अभियंते यांचे संगनमत आहे. सर्व अधिकाऱ्यांची पैश्याची वसुली हेच मानधनावर असलेले अधिकारी करतात असा आरोप नितीन भुतारे यांनी केला आहे.

मागील काही वर्षापासून मानधनावर काम करणाऱ्या अभियंत्यांची मालमत्ता चौकशी करण्यात यावी अशी मागणीही नितीन भुतारे यांनी केली आहे. भुयारी गटार योजना, फेज टू योजना, अमृत योजना, अशा करोडो रुपयांच्या योजनांची कायम सेवेत असलेले व मानधनावर असलेल्या अभियंत्यांनी भ्रष्टाचार करून वाट लावली. सर्व बोगस कामे यांच्यामुळेच झाले आहेत.

ही अहिल्यानगर महानगरपालिकेची सत्य परिस्थिती चित्रा वाघ यांनी माहिती नाही. त्यांनी केलेली मागणी म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्या सारखी आहे. चित्रा वाघ यांनी मानधनावरील अभियंत्यांना कायम सेवेत रुजू करण्याची मागणी चुकीची असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर चौकशी करून ही मागणी पूर्ण करण्यात येऊ नये, असे निवेदन नितीन भुतारे यांनी दिले आहे.

दरवर्षी हजारो विद्यार्थी अभियांत्रिक परीक्षा देऊन उत्तीर्ण होतात अश्या लोकांना नवीन तरुणांना आपण काम द्यावे. वास्तविक पाहता यापूर्वी ज्या अभियंत्यांनी दहा वर्ष एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम केले असेल तर त्याची कामाची एकंदरीत गुणवत्ता व त्याचे कामाचे स्वरूप बघून त्याला दुसऱ्या म्हणजेच इतर जिल्ह्यांमध्ये त्याला स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पुन्हा दहा वर्षे काम करण्याची संधी देण्यात यावी, त्या सर्वांनाच कामे मिळतील व नव्याने येण्याऱ्याना सुद्धा काम करण्याची संधी मिळेल.

# पिण्याच्या गढूळ पाण्याने आरोग्यास धोका

## सारसनगरमधील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनपा आयुक्तांना निवेदन



सारसनगर मधील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनपा आयुक्तांना निवेदन देताना अविनाश घुले, माजी उपमहापौर गणेश भोसले, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – सारसनगर परिसरातील मधुबन, राजमाता, कपिलेश्वर कॉलनी, त्रिमूर्ती चौक, साईसोना अपार्टमेंट परिसर तसेच कानडे मळा, आशीर्वाद कॉलनी, चौधरीनगर, विद्यासागर कॉलनी येथे गेल्या १ महिन्यापासून गढूळ पाणी येत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, जलअभियंता परिमल निकम आदी उपस्थित होते.

गेल्या १ महिन्यापासुन सारसनगर भागातील वेगवेगळ्या ठिकाणी घाण पाण्याचा प्रश्न भेडसावत असून या घाण पाण्यामुळे नागरिकांना जुलाब, उलट्या, पोट दुखणे या सारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून अनेक वेळा महानगरपालिका प्रशासनाकडे या घाण पाण्याविषयी तक्रार करुन देखील कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना होत नसल्यामुळे हा सारसनगरचा घाण पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनपा आयुक्तांशी चर्चा करण्यात आली असे प्रकाश भागानगरे यांनी सांगितले.

महापालिका प्रशासनाने तातडीने उपयोजना करून पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन आयुक्त यशवंत डांगे यांनी शिष्टमंडळाला दिले.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करावेत

नगर – जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे व योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४–२५ या वर्षासाठी जिल्ह्यातील एक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत पुरुष खेळाडू, गुणवंत महिला खेळाडू व गुणवंत दिव्यांग खेळाडू अशा एकूण चार पुरस्कारांसाठी अर्ज ३१ जुलै २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

या पुरस्कारासाठी १ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी केलेल्या काम गिरीचा विचार केला जाणार असून, खेळाडूंच्या बाबतीत मागील पाच वर्षांतील कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकांच्या बाबतीत मागील दहा वर्षांची कामगिरी विचारात घेतली जाणार आहे.

गुणवंत खेळाडू पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या खेळाडूने पुरस्कार वर्षासह मागील पाच वर्षांतील किमान दोन वर्षे जिल्ह्याच्या मान्यताप्राप्त अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असावे. गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्याने सतत दहा वर्षे महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असावे व पुरस्कार वितरित होणाऱ्या वर्षात वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षांत किमान वरिष्ठ गटातील राज्य किंवा राष्ट्रीय पदक विजेते, तसेच कनिष्ठ शालेय गटातील राज्य ते राष्ट्रीय पातळीवरील पदक विजेते खेळाडू घडवलेले असावेत. सांघिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेला खेळाडू अथवा राज्य/जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहील. अर्ज विहित नमुन्यात संघटनेमार्फत अथवा वैयक्तिकरित्या सादर करणे आवश्यक राहील.

अर्जाचा नमुना ७ ते २१ जुलै २०२५ दरम्यान जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथून प्राप्त करून परिपूर्ण अर्ज बंद लिफाफ्यात विहित मुदतीत सादर करावेत. पुरस्काराबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# प्रत्येक संकटात डॉक्टर सेवा देण्यासाठी सज्ज

## डॉ. संजय असनानी यांचे प्रतिपादन; लायन्स क्लबच्या वतीने डॉक्टर व सीए यांचा सन्मान



अहिल्यानगर शहरात कार्यरत असलेल्या लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने डॉक्टर व सीए यांचा सन्मान करुन डॉक्टर आणि सीए दिवस साजरा करण्यात आला. रुग्णांसाठी देवदूताची भूमिका पार पाडणारे डॉक्टर व आर्थिक नियोजनाची घडी बसविणारे सीए यांचा सत्कार करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

नगर – समाजात सर्वात मोठी सेवा म्हणजे रुग्णसेवा होय. प्रत्येक संकटात डॉक्टर सेवा देण्यासाठी सज्ज असतात. हे कोरोना काळात सर्व डॉक्टर बांधवांनी दाखवून दिले. वेदना दूर करण्यासह मनुष्याला नवजीवन देण्याचे कार्य डॉक्टर करतात. तर सीए आर्थिक नियोजन करुन त्यांच्या सल्लयाने व्यवसाय, उद्योगाची भरभराट होत असते. समजात कार्यरत असलेले डॉक्टर व सीए अत्यंत महत्त्वाचे घटक आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे डॉ. संजय असनानी यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर शहरात कार्यरत असलेल्या लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने डॉक्टर व सीए यांचा सन्मान करुन डॉक्टर आणि सीए दिवस साजरा करण्यात आला. रुग्णांसाठी देवदूताची भूमिका पार पाडणारे डॉक्टर व आर्थिक नियोजनाची घडी बसविणारे सीए यांचा सत्कार करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लायन्सचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संजय असनानी, सचिव प्रशांत मुनोत, कोषाध्यक्ष दिलीप कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख डॉ. अमित बडवे, डॉ. मीरा बडवे उपस्थित होते.

डॉ. अमित बडवे म्हणाले की, कोरोना काळात डॉक्टरांनी जीवाची बाजी लावून अनेकांना जीवदान दिले. डॉक्टर हा रुग्णांची सेवा करुन त्यांना नवजीवन देणारा देवदूत आहे. तर समाजातील आर्थिक गणित उत्तम ठेवण्याचे कार्य सीए करीत असतात. या दोन्हींच्या योगदानाने देशाची प्रगती साधली जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात डॉक्टर असलेल्या युवक–युवतींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. उपस्थितांच्या हस्ते डॉ. मानसी असनानी, डॉ. सिमरन वाधवा, डॉ. अनघा परगावकर, ओरल सर्जन डॉ. तुलसी कृष्णा, डॉ. आकांक्षा गार्जे, ऑर्थोडॉन्टिस्ट डॉ. राजलक्ष्मी राय, सीए किरण भंडारी, ऑन्को सर्जन डॉ. अद्वैत वैद्य, डॉ. सचिन घुले, डॉ. अंजू घुले, डॉ. नीरज गांधी, डॉ. भूषण खराचे, गणेश गाव्हाणे, डॉ. सतीश सूपेकर, डॉ. गणेश झरेकर, डॉ. तेजश्री जुंगडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हरजितसिंह वधवा, अरविंद पारगावकर, संतोष माणकेश्वर, सुनिल छाजेड आदींसह लायन्सचे सदस्य उपस्थित होते.



आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा ४७ वा रेझिंग डे मध्ये सहभागी झालेले माजी सैनिक.

# देशसेवेच्या कार्यात आक्रमक अकरा मराठा युनिटचे मोठे योगदान

## कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांचे प्रतिपादन; मराठा इन्फट्रिचा ४७ वा रेझिंग डे उत्साहात साजरा

नगर – आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा ४७ वा रेझिंग डे अहिल्यानगर मध्ये उत्साहाने साजरा होत आहे. देशसेवेच्या कार्यात आक्रमक अकरा युनिटचे मोठे योगदान आहे. स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून सर्व माजी सैनिक एकत्रित आल्याचा आनंद होत आहे. सेवानिवृत्तीनंतरही एकजूट राहिले तर माजी सैनिकांचे प्रश्न सुटतील. देशसेवेसोबतच सामाजिक कार्यातही माजी सैनिक आघाडीवर आहेत, असे प्रतिपादन कर्नल डॉ. सोमेश्वर गायकवाड यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर रोड येथील हॉटेल आकाश येथे आक्रमक अकरा मराठा इंफट्रीचा रेझिंग डे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांच्यासह सुभेदार दत्तात्रय येणारे, सुभेदार महादेव कोतकर, सुभेदार बापू साठे, सुभेदार बाबासाहेब गवळी, सुभेदार मोहन दुसिंगे, सुभेदार सखाराम शिंदे, सुभेदार मोहन शिंदे, महादेव बटोळे, जयसिंग पवार, मंगेश गलगटे, दादा जपकर, दिलीप शेळके, दत्ता वाळके, विनायक जरे, रघुनाथ मगर, रवींद्र कराळे, राजेंद्र गांजुरे, गोवर्धन शेलार, अविनाश साठे, योगेश निंभोरे, नानासाहेब साठे, रोहिदास मापारे, उत्तम भालेकर, दत्ता धायगुडे, कुंडलिक चिमटे, संजय डोईफोडे, संदीप कळमकर, लहू घाडगे, अनिल कोठुळे, संदीप शिर्के, अशोक फुलसौंदर, वाल्मीक ओहोळ, पंढरीनाथ बुटे, हरिश्चंद्र कापरे आदींसह माजी सैनिक उपस्थित होते. महादेव कोतकर यांनी आभार मानले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्र मोठे

## सौ. सविल कुलकर्णी यांचे प्रतिपादन; सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्यावतीने जीवन चरित्रावर एकपात्री प्रयोग



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचावर अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट सौ. सविल कुलकर्णी यांनी एकपात्री प्रयोगातून सादर केला.

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे कर्तृत्व, नेतृत्व व दातृत्व इतकं मोठं आहे की त्यांचे चरित्र पुन्हा पुन्हा ऐकावे, वाचावे व आचरणात आणावे. असे प्रतिपादन सौ. सविल कुलकर्णी यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 'मी अहिल्या बोलते' या एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचचे शरद कुलकर्णी, ज्योती केसकर, पुष्पा चितांबर, एस आर जोशी, स्नेहल वेलणकर, पुष्पा कोरे, हरिश्चंद्र थिगळे संतोष गोरे, श्रीकांत नाईक, सुनीता पाटील, बलभीम पांडव व बाजीराव जाधव उपस्थित होते.

आपल्या एकपात्री प्रयोगात सौ. सविल कुलकर्णी यांनी अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट उलगडला. लग्नानंतर अहिल्यादेवी यांनी युद्ध कौशल्याचे धडे गिरवले न्यायदान, राजकारण, राज्यकारभार, राजनीती घराण्यातील संस्कार व प्रचंड वाचन या सर्व गोष्टीं त्यांनी आत्मसात केल्या. अनेक संकटे दुःखाचे प्रसंग त्यांच्यावर आले मल्हाररावांनी सांगितल्याप्रमाणे त्या प्रजेच्या आई झाल्या पुढे त्यांनी साम्राज्य निर्माण केले व रयतेवर प्रचंड प्रेम केले. त्यांच्या राज्यात त्यांनी कलाकार, मूर्तिकार, शिल्पकार, विणकर साहित्यिक, कवी, शेतकरी यांना राजाश्रय दिला. मंदिरे, घाट, धर्मशाळा यांच्या मोठ्या प्रमाणात जीर्णोद्धार केला. तसेच पशुपक्षी प्राणी यांचे अनेक वने उपवने तयार केली. धरणे, पाटबंधारे, कालवे काढून राज्याच्या महसूल मोठ्या प्रमाणात वाढविला. भारदस्त आवाजात व अत्यंत सुंदर वेशभूषा परिधान करून कुलकर्णी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनपट आपल्या एक पात्री प्रयोगातून उलघडला.

सूत्रसंचालन बलभीम पांडव यांनी केले. बाजीराव जाधव यांनी आभार मानले.

# दर्शनप्रभाजी, अनुपमाजी यांचे लुणिया परिवारातर्फे स्वागत



दर्शनप्रभाजी, अनुपमाजी यांचे लुणिया परिवारातर्फे स्वागत करण्यात आले.

नगर – जैन धर्मातील सर्वात पवित्र अशा चातुर्मास पर्वाला लवकरच सुरुवात होत आहे. यानिमित्त साधूसाध्वीजींच्या सान्निध्याची तसेच त्यांचे विचार ऐकण्याची पर्वणीच भाविकांना मिळणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर साध्वी दर्शनप्रभाजी म.सा. व अनुपमाजी म.सा. आदि ठाणा ८ यांनी बुरुडगाव रोडवरील साईनगर येथील लुणिया परिवाराच्या तीर्थ बंगल्यावर येवून भाविकांना आशीर्वाद देत मार्गदर्शन केले.

साध्वीजींचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी श्रावक संघाचे आनंदराम मुनोत, रसिकलाल लुणिया, अभय लुणिया, हर्ष लुणिया, जैन कॉन्फरन्सचे अशोक (बाबूशेठ) बोरा, बाबूशेठ लोढा, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, रवी सेलोत, श्रीपाल गांधी, योगेश चंगेडिया, समीर बोरा, संतोष गांधी, कमलेश भंडारी, राजेंद्र बलदोटा, नितीन शिंगवी, संजय बोरा, नितीन कटारिया, ॲड. प्रमोद मेहेर, विनायकनगर जैन स्थानक अध्यक्ष राजेंद्र भंडारी, प्रकाश बोथरा, सुनिल चोरबले, रोशन मंडलेचा, प्रविण मुनोत, प्रितम गांधी, भास्कर पवार आदींसह लुणिया परिवारातील सदस्य व भाविक उपस्थित होते.

स्वागत करताना हर्ष लुणिया म्हणाले, साधूसाध्वीजींचे आशीर्वाद व सान्निध्याचा लाभ मिळणे भाग्याची गोष्ट आहे. आमचा परिवार नेहमीच साधूसाध्वीजींच्या सेवेत रममाण होतो. यातून सकारात्मक ऊर्जा मिळते. दोन्ही साध्वीजींचे मागदर्शन कायम अनमोल असेल.

दर्शनप्रभाजी म.सा.म्हणाल्या की, नगरमध्ये धार्मिक वृत्ती प्रकर्षाने जाणवते. लुणिया परिवार हा नेहमी साधूसाध्वीजींच्या सेवेत अग्रेसर असतो. परिवाराची तिसरी पिढीवरही चांगले धार्मिक सस्कार झालेले पाहून आनंद वाटतो.

यावेळी साध्वीजी दर्शनप्रभाजी म.सा. यांचे गई भैस पाणी में या विषयावर अतिशय उदबोधक प्रवचन झाले. मनुष्याने आयुष्य जगताना, प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडताना तसेच समाजात कसे वागावे, बोलावे यासंदर्भात त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी नवकारशीचा लाभ घेतला. लुणिया परिवाराची धार्मिकता कौतुकास्पद आहे. मलांवरही बालयातच चांगले संस्कार झाल्याचे पाहून आनंद होतो. अभय लुणिया यांनी आभार मानले.

# राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई – राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल.

यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.

